# प्रेसनोट

दि.१९/०२/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे.,जि.अहिल्यानगर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७. |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अशोक मनोहर शिंदे,वय –४९,सहाय्यक लेखाधिकारी,वेतन व भनीनी पथक,जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग,अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/– रूपये, पहिला हप्ता ८,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे शिक्षक असुन ते दिनांक ०३/०६/२०२२ रोजी शिक्षकी पेशातुन सेवानिवृत्त झाल्यानंतर तक्रारदार यांना पेन्शन मंजुर झाली असुन ते नियमितपणे मिळत आहे. परंतु तक्रारदार हे सेवानिवृत्त झाल्यापासुन त्यांना प्रोव्हिडंड फंड आज अखेर मिळालेला नाही. त्याकरीता तक्रारदार हे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग या कार्यालयात काम करणारे अशोक मनोहर शिंदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन पाच सहा वेळेस समक्ष भेट घेतली असता त्यावेळी अशोक मनोहर शिंदे यांनी तक्रारदार यांस म्हणाले की,तुमचे काम खुप जुने असुन ते करून देण्यासाठी बक्षीस म्हणुन २०,०००/– रूपये दयावे लागतील या बाबतची तक्रार दि. १८/०२/२०२५ रोजी ला.प्र.वि.अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती.त्यानुसार दि. १८/०२/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली.लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान अशोक मनोहर शिंदे यांनी तक्रारदार यांची प्रोव्हिडंड फंडची फाईल पास करण्यासाठी लाचेची मागणी पंचा समक्ष केली.दि.१८/०२/२०२५ रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग,अहिल्यानगर येथे सापळा आयोजित केला असता तक्रारदार यांच्याकडुन अशोक मनोहर शिंदे यांनी पंचासमक्ष ८,०००/– रूपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.सदर बाबत आरोपी विरूध्द कोतवाली पोलीस स्टेशन,जि.अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
अ‍ॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर